| MHPU200013972026 | *किरकोळ फौजदारी खटला क्र. १४३/२०२६* |
| --- | --- |
| | **ऋतिक बाळु चव्हाण**<br>**वि.**<br>**शिरुर पोलीस स्टेशन**<br>**महाराष्ट्र शासन** |

## निशाणी १ वर आदेश पारीत

## (पारित दिनांक ०४/०७/२०२६)

१. अर्जदार नामे ***ऋतिक बाळु चव्हाण*** यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ५०३ प्रमाणे शिरुर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. २३५/२०२६ या गुन्हयामध्ये जप्त केलेला **महिंद्रा कंपनीची थार चारचाकी वाहन रजि. नंबर MH.12-ZG-6732 चेसिस नं. MA1UN 2YY2T2A20888 इंजिन नं. YYT4A67625** याचा ताबा मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराच्या कथनांनुसार वर नमुद वाहन हे अर्जदार यांच्या मालकीची व दैनंदिन वापरातील असून सदरचे चारचाकी वाहन पोलीस स्टेशनमध्ये पडून राहिलेस अर्जदार यांची गैरसोय होणार आहे. अर्जदार याने सदरचे चारचाकी वाहन हे त्यांच्या मालकीची आहे हे दाखविण्यासाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे अर्जदारने याकामी दाखल केलेली आहेत.

३. सदर अर्जामध्ये तपासी अंमलदार यांनी त्याचे म्हणणे देऊन असे कथन केले आहे की, अर्जदाराने सदरचा गंभीर दखलपात्र व अजामीनपात्र स्वरुपाचा गुन्हा फिर्यादीला अग्नीशास्त्राने जिवे ठार मारण्याचे उद्वेशाने फायरींग करुन या वाहनातुन निघून गेलेले आहेत. तसेच ते सदरचे वाहन न्यायालयासमोर हजर करतील याची शाश्वती नाही. त्याचप्रमाणे अर्जदार हे सदरील वाहनाच्या रंगामध्ये बदल करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती त्यांनी केली आहे. त्याचप्रमाणे सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, सदरचे वाहन अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास ते वाहन विकण्याची व त्यात बदल करण्याची शक्यता आहे. वाहन अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास याचप्रमाणे दुसरे गुन्हे करण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

४. अर्जदार तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराने सदर केस कामी सदर वाहनाची आर.सी.बुक, अर्जदाराच्या आधारकार्डची प्रत, विमापत्राची प्रत तसेच गु.र.नं.

२३५/२०२६ ची एफ.आय.आर. ची प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. सादर केलेल्या कागदपत्रांवरुन सदरचे वाहन हे अर्जदारच्या मालकीच्या असल्याचे दिसून येते. त्यामुळे ***मा. सर्वोच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय सुंदरभाई विरुध्द गुजरात सरकार, एआयआर २००३ एससी ६३८*** मधील गुणोत्तरानुसार अर्जदार यांची जप्त केलेले वाहन ही पोलिस स्टेशनला पडून राहिल्यास खराब होणार आहे. त्यामुळे जप्त केलेला वर नमुद मुद्देमाल काही अटी व शर्तीवर सदरील मालमत्ता अर्जदाराच्या ताब्यात देणे योग्य होईल. म्हणून खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. शिरुर पोलीस ठाणे रजि.नं.२३५/२०२६ मध्ये जप्त केलेले **महिंद्रा कंपनीची थार चारचाकी वाहन रजि. नंबर MH.12-ZG-6732 चेसिस नं. MA1UN 2YY2T2A20888 इंजिन नं.** YYT4A67625 हे चारचाकी वाहन अर्जदार यांच्या ताब्यात रक्कम रुपये १९,००,०००/-(एकोन्नीस लाख रुपये फक्त) चे हमीपत्र दिल्यानंतर देण्यात यावे.

३. अर्जदारने सदरची चारचाकी यांच्या मध्ये सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत त्रयस्थ इसमाचा हक्क किंवा अधिकार निर्माण करु नये.

४. अर्जदारने प्रकरणाच्या चौकशीसाठी सदर चारचाकी आवश्यकता असल्यास ती न्यायालयापुढे हजर करावा.

५. अर्जदाराने सदरच्या चारचाकीचे सर्व बाजूने चार फोटो काढून सदर मुद्देमालाचा ताबा मिळाल्यापासून सात दिवसांचे आत दाखल करणेचे आहेत.

६. अर्जदारने सदरची चारचाकीमध्ये कोणत्याही प्रकारचा फेरफार अगर बदल करायचा नाही.

७. सदरची चारचाकीचा कोणत्याही गुन्हयात वापर झाल्यास व गुन्हा दाखल झाल्यास आदेश त्याच वेळी रद्द होईल.

८. तपासी अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की त्यांनी बंधपत्र व पंचनामा दोषारोपपत्रासोबत पाठवून द्यावा.

९. सदरचा आदेश पोलीस ठाणे शिरुर यांना कळविण्यात यावा.

SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Date: 2026.07.04 12:55:45 +0530

**शिरुर**
दिनांक – ०४/०७/२०२६

**(संजय दि. वानखेडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. १
घोडनदी, शिरुर, जि. पुणे.